
अक्षरे



# अधूरे

संमत

**अक्षरे**
संमत प्रकाशन : ४
पहिली आवृत्ती
पाडवा, १७ मार्च १९९१

**प्रकाशक**
उमादेवी खैरे
संमत प्रकाशन
३७४ सिंध हाउसिंग सोसायटी
औंध, पुणे - ४११ ००७.

**मुद्रक :**
सुजित पटवर्धन
मुद्रा, ३८३ नारायण पेठ, पुणे ३०.

**लेखक**
विश्वनाथ खैरे
उमादेवी खैरे

**चित्रक**
यशोदा अवचट
सचीन रास्ते

किंमत १५ रुपये

ISBN 81-85280-01-0

प्रसादच्या पिढीला...

आणखी वाचा

युगाणी


इमराठी गाणी

# अक्षरे

अक्षरे
आम्हाला खूपदा
मनातच म्हणाली
आम्ही जगभर असतो
सगळं काही समजून सांगतो
सगळे आमच्या जिवावर बोलतात
पण कुणी, आम्हाला समजून घेत नाही
आमच्या आत आत पहात नाही
सगळ्यांना वाटतं, आम्ही रेघा
काळ्या कोरड्या ओढा बघा
लिहितावाचता येत नाही
त्यांना आम्ही दिसत नाही
आमचा आकार आठवत नाही
आमचा भेद कळत नाही
आम्ही जणू परदेशी
लिहितात वाचतात त्यांना सुद्धा
आमचं रूप भावत नाही.

अक्षरे
म्हणाली ते पटले.
मग आम्हाला वाटले,
यांचे खरे आहे. म्हटले
वाटते ते सारे काही बोला
आमच्यापुढे तुमचे भांडार खोला.
ती सारी, खूष झाली आनंदाने नाचत आली
अंग रंग नवे लेऊन आली
चित्रविचित्र होऊन आली
ती चित्रकांनी सजीवली.
अडाणीही समजतील
नकळत उमजतील.
रूप मनात ठसून जाईल
जुळेसुद्धा ओळखू येईल
सहजच आठवत राहील.
वाचणार आमचे बोल वाचतील
समजतील, समजावतील.

विश्वनाथ खैरे, उमादेवी खैरे



अ अगदी पहिला
अबोल कसा राहिला

अ

अ च्या पाठी काठी
आची आरोळी मोठी

# आ







इतक्या जागी वाकली
इ नाचात नाही चुकली



ई ला नाचायची घाई होई
हात उलटाझोकून देई

# ई






उचे ओठ झाले गोल
आतून आला उसासा खोल

उ

उ ला मागे लावला कान
ऊने घेतली लांबट तान



ऊ




ए तुझा एकच पाय
एवढा लांबवतोस काय

# ए

ऐ तर ए हून ऐटबाज
ऐसपैस तुऱ्याचा साज

ऐ






डोक्यावर हात नेतो
आ हाकेला ओ देतो

# ओ

औचा मोठा डौल रे
डोक्यावरती दोन तुरे

# औ






अबोल अ अं अं रुसतो
टिंबू होऊन डोक्यावर बसतो


अबोल अ अः अः हसतो
लिंबू टिंबू होउन फसतो



आडवी कुबडी उभा दंड
ऋ ऋषींचं उघडं भांडं



# ऋ




कची कडी कडवी
काठीवर ती आडवी

क

खच्या पोटात व चा वडा
ख तो खाऊन
खोकतो केवढा



ख




गचे तोंड
गणपतीची सोंड
मागे काय
हत्तीचा पाय



घच्या पोटाला केवढी घडी
तरि पाठ आहे ताठ खडी

घ







चचा चमचा चहाला
आडवा दांडा मोडला
उभा करून जोडला

च

छकुला चिमणा खेळतो
छताला पाय लावतो



# छ




जची जीभ जराशी लांब
आधाराला जबरा खांब

ज

इ नं पाहिलं मागं वळून
तिला दिसली बायजा
मग म्हणाल्या दोघी मिळून
'झपूर्झा ग झपूर्झा'




# इ




टचे पोट गोलमटोल
टमाटे खातो टपोरे गोल

# ट

ठची गाठ
सुटणार नाही



# ठ





डची गाडी धडधडत आली
वळणावरून गडगडत गेली

# ड

ढचा ढग ढम ढम ढम
वीज बघ चम चम चम

# ढ







णच्या पेल्यात पाणी आणलं
आणिक वर झाकण मांडलं

ण

तमधे चितळ
चितळमधे त
ऐकुन हसतील
त्यांचे दात दिसतील



# त



आभाळातून थेंब थेंब येतो
थचा मोर थयथय नाचतो
ना थकतो ना थांबतो

थ

ढग दमला दगडावर बसला
दोघे मिळून, द मला दिसला

द







घ चा कान धने धरला
ओढला, काढला,
स्वतःला लावला

# ध

नच्या नळाला
पाणीच नाही




न




पची पाटी खांबाला छोटी
लावली खरी
पण राहिली कोरी

प

पच्या खांबाला फुटला फाटा
प पहिला छोटा
पण फ फार मोठा



फ





अबब! बघी तर बट्टी
कुणी बसवली
तोंडावर पट्टी

ब

भ भाऊ हा भाजीवाला
भोपळा भेंडी घेउन आला

भ





भने भोपळा मला दिला
भ भाउचा म मामा झाला

# म

या या करा नमन
य करतायत योगासन









रची तुतारी
एकीवर दुसरी

# र

लचा लसूण
खाल का हसून



# ल




वा वा व राव
वडावर बसून
वेडावता काय

व

शंकराच्या देवळाला
शंभर खांब
शशीचा शेपटा
वावभर लांब

श






प च्या पाटीवर ओढली रेष
नाव लागले षचे,
ष झाला खूष

ष

तीन तुताऱ्या बासऱ्या दोन
सचे संगीत ऐकेल कोण




# स



ह हा हि ही, हसमुखभाई
पोट धरून हसत राही

# ह

निळे निळे खोल तळे
जळात मासळी सळसळे



# ळ



बगळेबुवा, वाईट लक्षण
डोळे मिटून मासे भक्षण

# क्ष

अक्षरे अ ते ज्ञ
अज्ञाचे व्हा सुज्ञ



ज्ञानाचा दिवा
जगात लावा

ज्ञ





संमत

ISBN 81-85280-01-0